जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली
शाखा :- ग्रा.पं.
दि. -6 JAN 2018
आवक क्र. 1436
ना.त./तहसिलदार/सर्वसाधारण)/नि.उ.जि./जिल्हाधिकारी

**महाराष्ट्र शासन**

क्र.ग्रापनि-२०१७/प्र.क्र.१८६/पंरा-२
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ८ डिसेंबर, २०१७.

प्रति,

१. जिल्हाधिकारी, (सर्व)
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, (सर्व)

ग्रामपंचायत शाखा,सांगली.संकलन
दिनांक:- 9/1/18
लिपीक/अ.का./ना.त./उ.जि.(महसूल)

विषय :- उपसरपंच निवडणुकीमध्ये जिल्हाधिकारी यांनी निवडणुक निरीक्षक नेमण्याबाबत.

संदर्भ :- राज्य मंत्रीमंडळाची दिनांक २१ नोव्हेंबर २०१७ रोजी पार पडलेली बैठक

महोदय,

महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८/२०१७ दिनांक १.९.२०१७ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये सुधारणा करुन ग्रामपंचायतींच्या सरपंचाची जनतेतुन थेट पध्दतीने निवड करण्याबाबत तरतुद करण्यात आली आहे. त्यानुसार उपसरपंच निवड पध्दतीमध्ये सुध्दा बदल करण्यात आलेला आहे. यापुर्वी ग्रामपंचायतीच्या पहिल्या सभेमध्ये सरपंच आणि उपसरपंच पदाची निवड करण्यात येत होती. परंतु नव्याने केलेल्या सुधारणेअन्वये पहिल्या सभेमध्ये फक्त उपसरपंच पदाची निवडणूक पार पाडली जाते.

२. सदर पुनर्प्रख्यापित केलेल्या अध्यादेशानुसार कलम ३३ (२) मध्ये “सभेचे अध्यक्षस्थान जिल्हाधिकारी आदेशाव्दारे याबाबत” या मजकुराऐवजी “सभेचे अध्यक्षस्थान सरपंच स्विकारील, सरपंचाचे पद रिक्त असेल तर जिल्हाधिकारी आदेशाव्दारे याबाबत” हा मजकुर समाविष्ट करुन सुधारणा करण्यात आली आहे.

३. सार्वत्रिक निवडणुकीनंतर प्रथम सभेची दिनांक जिल्हाधिकारी घोषित करतात. त्या सभेमध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत (सरपंच आणि उपसरपंच) निवडणुक नियम, १९६४ मधील कलम ४ अन्वये अध्यासी अधिका-याने अशा सभेसंबंधीची नोटीस पंचायतीच्या प्रत्येक सदस्याला अशा सभेच्या कमीत कमी तीन पुर्ण दिवस अगोदर दयायची व्यवस्था केली पाहिजे. अध्यासी अधिकारी किंवा चिटणीसास/सचिवास अशी नोटीस देता येईल अशी तरतुद आहे. त्याचप्रमाणे या नियमांमध्ये नामनिर्देशन दाखल करणे, नामनिर्देशन पत्राची छाननी करणे आणि उमेदवारी मागे घेणे यासारखी विविध महत्वाची कामे अध्यासी अधिकारी आणि चिटणीस/सचिव यांना करावी लागतात.

४. उपरोक्त सुधारणेच्या परिणामस्वरुप उपसरपंच निवडणूकीच्या सभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच असणार आहेत. त्यामुळे उपसरपंच निवडणूकीची प्रक्रिया

प्रशासकियदृष्टया सुरळीतपणे पार पडण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी "निवडणूक निरीक्षक" म्हणुन गट ब पेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिका-याची नियुक्ती करण्याचे निदेश देण्यात येत आहेत.

आपला,

(संजय बनकर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

नोंद घेवून S.O. File दाखल

तहसिलदार (सर्वसाधारण)

जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली